# अहिल्यानगर महानगरपालिका
## पाणी पुरवठा विभाग

वेबसाईट : www.amc.gov.in
ई-मेल : amc_anr@rediffmail.com



जा.नं. शहर पा.पु. २०० दिनांक :- २१/०५/२०२५

प्रति,
मा. प्रसिध्दी विभाग प्रमुख,
अहिल्यानगर महानगरपालिका.

विषय- अहिल्यानगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेचा वीज पुरवठा सातत्याने खंडीत होत असल्याने शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगर भागाचा पाणी पुरवठा विस्कळीत होत असले बाबत...

महोदय,

विषयांकीत बाबत कळविण्यांत येते की, अहिल्यानगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजने करिता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी कडून होत असलेला वीज पुरवठा मागील काही दिवसांपासून सातत्याने खंडीत होत आहे. (दिनांक ११/०५/२०२५ ते दिनांक २०/०५/२०२५ दरम्यान खंडीत वीज पुरवठयाचा तपशील खालील प्रमाणे. )

| अ.क्र. | दिनांक | खंडीत वीज पुरवठया बाबतचा तपशिल |
|---|---|---|
| १ | ११/०५/२०२५ | सकाळी १०.२५ ते दुपारी १२.३० पर्यंत |
| २ | १२/०५/२०२५ | दुपारी ०१.४० ते दुपारी १.४५ पर्यंत |
| ३ | १३/०५/२०२५ | पहाटे ०५.४५ ते सकाळी ०७.५० पर्यंत |
| ४ | १३/०५/२०२५ | सकाळी ०८.०० ते सकाळी ०८.१० पर्यंत |
| ५ | १६/०५/२०२५ | सकाळी ०८.२५ ते सकाळी ०८.३० पर्यंत |
| ६ | १९/०५/२०२५ | दुपारी ०४.५५ ते सायंकाळी ०५.२० पर्यंत |
| ७ | १९/०५/२०२५ | रात्री ०८.२५ ते रात्री ०८.४५ पर्यंत |
| ८ | २०/०५/२०२५ | दुपारी ०४.३५ ते सायंकाळी ०४.५५ पर्यंत |
| ९ | २०/०५/२०२५ | सायंकाळी ०४.५७ ते सायंकाळी ०६.१० पर्यंत |
| १० | २०/०५/२०२५ | सायंकाळी ०७.४० ते रात्री ११.४५ पर्यंत |

वीज वितरण कंपनी कडून सातत्याने खंडीत होत असलेल्या वीज पुरवठयामुळे शहर पाणी पुरवठा योजने वरील मोटारी/ पंपसेट नियमितपणे चालविण्यास अडचणी निर्माण होत आहेत. व त्याचा शहरासाठी होणा-या दैनंदिन पाणी उपश्यावर त्याचा परिणाम होउन शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगरांचा पाणी पुरवठा विस्कळीत होत आहे.

Scanned with OKEN Scanner

मंगळवार दि.२०/०५/२०२५ रोजी अहिल्यानगर शहर पाणी पुरवठा योजनेच्या विळद पंपींग स्टेशन येथील वीज पुरवठा दुपारी ०४.२० वाजले पासून सायंकाळी ०६.१० वाजेपर्यंत तीन वेळा काही काळ खंडीत झालेला होता.

तदनंतर सायंकाळी शहर पाणी पुरवठा योजनेच्या विळद पंपींग स्टेशन परिसरात वादळी वा-यासह पाउस झाल्याने सायंकाळी ०७.४० वाजता वीज पुरवठा खंडीत झालेला होता. वीज पुरवठा खंडीत झालेनंतर वीज वितरण कंपनीचे कर्मचारी व महानगरपालिकेचे विळद येथील कर्मचारी यांनी तातडीने दुरूस्तीचे काम हाती घेवून खंडीत झालेला पुरवठा रात्री ११.४५ वाजता सुरू केला.

वीज पुरवठा सुरू झालेनंतर मुळानगर, विळद येथून टप्याटप्याने पाणी उपसा सुरू करण्यात आला. तदनुसार वसंतटेकडी येथे पहाटे ०५.३० वाजता पूर्ण क्षमतेने पाणी उपसा सुरू झालेला आहे. परंतू सलग ०४ तास खंडीत झालेला वीज पुरवठा व त्यानंतर पुर्ण क्षमतेने पाणी उपसा सुरू करण्यास लागलेला कालावधी यामुळे शहर पाणी वितरणाच्या टाक्या भरता आलेल्या नाहीत.

त्यामुळे आज बुधवार दि.२१/०५/२०२५ रोजी रोटेशन नुसार पाणी वाटपाच्या शहराच्या मध्यवर्ती भागास म्हणजेच मंगलगेट, रामचंद्रखुंट, झेंडीगेट, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, दाळमंडई, काळू बागवान गल्ली, धरती चौक, बंगाल चौकी, माळीवाडा, कोठी या भागात व गुलमोहर रोड, प्रोफेसर कॅालनी परिसर, सिव्हील हाडको, प्रेमदान हाडको, टी.व्ही. सेंटर परिसर, म्युनिसीपल हाडको, इत्यादी भागात पाणी पुरवठा झालेला नाही, या भागात गुरूवार दि.२२/०५/२०२५ रोजी करण्यात येईल.

तसेच गुरूवार दि.२२/०५/२०२५ रोजी रोटेशन नुसार पाणी वाटप शहराच्या मध्यवर्ती भागास म्हणजेच सिध्दार्थनगर, लालटाकी, तोफखाना, दिल्लीगेट, नालेगाव, चितळे रोड, आनंदी बाजार, कापड बाजार, ख्रिस्त गल्ली, पंचपीर चावडी, जुने म न पा कार्यालय परिसर, माळीवाडा, बालिकाश्रम रोड परिसर, व सावेडी इत्यादी भागात पाणी पुरवठा होणार नसून तो शुक्रवार दि.२३/०५/२०२५ रोजी करण्यात येईल.

त्याचप्रमाणे दुपारी ०४.०० वाजले पासून रात्री ११.४५ वाजे पर्यंत सातत्याने खंडीत होत असलेल्या वीज पुरवठयामुळे मंगळवार दि.२०/०५/२०२५ रोजी पाणी वाटप सुरू असलेल्या स्टेशन रोड परिसर, बालिकाश्रम रोडचा काही भाग या ठिकाणी पाणी वाटप करता आलेले नाही. या भागास आज दि.२१/०५/२०२५ रोजी पाणी वाटप करण्यात येईल.

सद्यस्थितीत मान्सुन पूर्व परिस्थिती असून याबाबत आजवरचा अनुभव पाहता मान्सुन पूर्व काळात वादळी वा-यामुळे शहर पाणी पुरवठा योजने करीता विदयूत वितरण कंपनीकडून होणारा वीज पुरवठा खंडीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. व खंडीत वीज पुरवठया मुळे नियमित पाणी उपसा होणेस अडचणी निर्माण होत असल्याने नागरिकांनी पाण्याचा योग्य साठा करून, असलेल्या पाण्याचा वापर काटकसरीने करावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे.

असे जाहिर आवाहन स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करावे.

जल अभियंता
अहिल्यानगर महानगरपालिका

प्रत : मा.आयुक्त तथा प्रशासक, अहिल्यानगर महानगरपालिका यांचे माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा उपायुक्त, अहिल्यानगर महानगरपालिका यांचे माहितीस्तव सविनय सादर.

Scanned with OKEN Scanner